0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) उप नियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांचेकडून दि. २६/०४/२०११ रोजी प्राप्त झालेले कागदपत्रे.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.३२/२०११/जा.४३४ दि.२६/०५/२०११, ४/६/२०११, २३/६/२०११, ४/०७/२०११, १६/०७/२०११ व २९/०७/२०११.
३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वागळे इस्टेट पोलिस ठाणे यांचे दि.४/०६/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन
४) दुर्गा गॅस एजन्सीचे मालक यशवंत शेट्टी यांचे दि.४/६/२०११ व २०/०६/२०११ रोजीचा अर्ज.
५) टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-२१४१चे मालक हिरालाल नागेश्वर उपाध्याय यांचे दि.२०/०६/२०११ रोजीचे लेखी निवेदन.
६) दि डेक्कन मर्चंट को.ऑ. बँक लिमिटेड, घाटकोपरचे शाखा प्रबंधक श्री. पी.पी. राणे यांचा दि.१६/०७/२०११ रोजीचा अर्ज.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.३२/२०११/जा. ७०२
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.

दिनांक : ३० /०८/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

श्री. विलास गणपत देवघरे यांचा स्वतःचा टी.एम.सी. शॉपिंग सेंटर, तिनहात नाका इंटरनेटी मॉलचे बाजुला ठाणे या ठिकाणी गाळा क्र. १२८ असुन सदर ठिकाणी ते फॅब्रीकेशचे सुमारे ७ वर्षापासून काम करीत आहेत. सदर ठिकाणी ते दुकानांचे बोर्ड बनवित असतात. सदर गाळ्याचे मुळ मालक सौ. संध्या विकास झाडे ह्या असून त्यांनी सदर गाळा ठाणे महानगर पालिकेकडून भाड्याने घेतलेला आहे. त्याचे बाजूलाच यशवंत शेट्टी याचे सदर ठिकाणी एकूण ४ गाळे आहेत. सदर ठिकाणी शेट्टी याची दुर्गा गॅस एजन्सी आहे. सदर गाळ्यामध्ये यशवंत शेट्टी हे हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमीटेड व भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमीटेडचे घरगुती तसेच व्यवसायाकरिता वापरले जाणारे गॅस सिलेंडरचा साठा करतात. श्री देवघरे यांचे गाळ्याचे उजवे बाजूला श्री. मंजू कुल्ले गौडा याचा गाळा असून सदर ठिकाणी त्याचे डिंगडॉग नावाचे चायनिज हॉटेल आहे. सदर ठिकाणी इतर काही व्यापारी यांचे

0002 गाळे असून सदरचे सर्व गाळे हे ठाणे महानगर पालिकेच्या मालकीचे आहेत. ठाणे महानगर पालिकेकडून सदर गाळे विविध इसमांना भाड्याने दिलेले आहेत. श्री. देवघरे यांचे बाजूलाच असलेल्या यशवंत शेट्टी याचे गाळ्यामध्ये ते दोन्ही प्रकारचे गॅस सिलेंडरचा साठा करुन ठेवत असतात. त्याकरिता त्याचेकडे ठाणे महानगर पालिका व अग्नीशमन दल यांचे परवाने आहेत अगर कसे हे श्री देवघरे यांना माहित नाही. तसेच कधी कधी गाळ्यामध्ये जागा नसल्यास नमूद यशवंत शेट्टी हे गॅस सिलेंडर टेम्पोमध्ये भरुन रस्त्यावर सुध्दा ठेवत असतात.

दिनांक ०१/०१/२०११ रोजी विलास गणपत देवघरे हे त्यांचे गाळ्याजवळ आले असता, त्यांना सदर ठिकाणी अग्नीशमन दल व पोलीस यांच्या गाड्या उभ्या असल्याचे दिसून आल्याने, त्यांनी चौकशी केली असता, यशवंत शेट्टी यांचे गाळ्यामध्ये सुमारे १५:०० वाजता गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याने आग लागली असून त्यामध्ये नितीन शेट्टी व रामकृष्ण हे दोन इसम भाजून जखमी झाल्याचे त्यांना समजले. तद्नंतर त्यांनी अग्नीशमन दल व ठाणे महानगर पालीकेचे अधिकारी यांचेकडे विचारणा केली असता, यशवंत शेट्टी याचेकडे सदर ठिकाणी घरगुती अथवा व्यवसायीक कारणासाठी वापरले जाणारे गॅस सिलेंडरचा साठा ठेवण्यासाठी अग्नीशमन दलाचा अथवा महानगर पालीकेचा कोणताही परवाना नसल्याचे त्यांना समजले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन यशवंत शेट्टी यांनी त्याचेकडे गॅस एजन्सीचा कोणताही परवाना नसतांना शासकीय तेल कंपन्यांचे घरगुती तसेच व्यवसायीक गॅस सिलेंडरचा बेकायदेशीरित्या साठा करुन गॅस सिलेंडर सारख्या ज्वलनशील पदार्थ स्वतःच्या कब्जात बाळगून मानवी जीवन धोक्यात येईल अशा प्रकारचे कृत्य करुन सदर ठिकाणी स्फोट होऊन दोन इसम जखमी झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ व २) भा.द.वि. कलम ३८५, ३३८ चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द वागळे इस्टेट पोलिस स्टेशन, ठाणे येथे गु.नो.क्र. I/०१/२०११ दि.०१/०१/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | थ्री व्हीलर टेम्पो क्र. एमएच-०३-एन-३७१० व त्यामधील ३७ कमर्शियल सिलेंडर | १ नग<br>३७ नग | ६८,५००/- |
| २ | थ्री व्हीलर टेम्पो क्र. एमएच-०३-एन-६८८५ व त्यामधील १९ कमर्शियल सिलेंडर | १ नग<br>१९ नग | ५९,५००/- |
| ३ | थ्री व्हीलर टेम्पो क्र. एमएच-०३-अेएन-२३२ व त्यामधील २५ कमर्शियल सिलेंडर | १ नग<br>२५ नग | ६२,५००/- |
| ४ | थ्री व्हीलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-२१४१ | १ | ५०,०००/- |
| ५ | १५ घरगुती व २० कमर्शियल गॅस सिलेंडर्स | ३५ नग | १४,५००/- |
| ६ | १६ कमर्शियल गॅस सिलेंडर्स (दुकान गाळ्यासमोरील फूटपाथावरील) | १६ नग | ८,०००/- |
| ७ | प्लास्टीक पाईपला नोजल असलेला लोखंडी रॉड | १ नग | १००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | लोखंडी वजनकाटा (फूटलेला व दबलेला) | १ नग | ५००/- |
| ९ | नोजल असलेले लोखंडी रॉड | ५ नग | ५००/- |
| | एकुण | | २,६४,१००/- |

उपरोक्त नमुद जप्त सिलेंडर मुद्देमालापैकी भारत पेट्रोलियम कंपनीचे ७० रिकामे व हिन्दुस्थान पेट्रोलियम कंपनीचे २१ रिकामे कमर्शियल सिलेंडर असून भारत पेट्रोलियम कंपनीचे २६ भरलेले कमर्शियल सिलेंडर आहेत. तसेच भारत पेट्रोलियम कंपनीचे ९ रिकामे व ६ भरलेले घरगुती वापरातील गॅस सिलेंडर आहेत.

सदर घटनेतील सिलेंडर स्फोटामध्ये जखमी झालेले इसम रामकृष्ण हरि शिंदे व नितीन नारायण शेट्टी यांचेकडे हॉस्पीटलमध्ये पोलीसांनी अधिक विचारणा केली असता, रामकृष्ण हरि शिंदे हा यशवंत शेट्टी यांच्या दूर्गा गॅस एजन्सीमध्ये डिलीव्हरी मॅन तसेच चालक म्हणून गेले ४-५ दिवसापासून काम करतो. सदर गॅस कंपनी ही इंडिक्यूब गॅस एजन्सी, चेंबूर यांचेकडून भारत पेट्रोलियम कंपनीचे पिवळ्या रंगाचे व दर्शन गॅस एजन्सी, कळवा यांचेकडून हिन्दुस्थान पेट्रोलियम कंपनीचे निळ्या रंगाचे गॅस सिलेंडर आणून ते ठाण्यातील वेगवेगळ्या हॉटेल मालकांना पूरवठा करतात. नेहमीप्रमाणे दि.०१/०१/२०११ रोजी तो कामावर हजर झाला असता, त्याला सांगीतल्याप्रमाणे त्याने इंडिक्यूब गॅस एजन्सी, चेंबूर येथून थ्री व्हीलर टेम्पोने गॅस घेवून आला व कपनीतील वसुली करणारा नितीन नारायण शेट्टी याचेजवळ कंपनीत थांबला असता, दुपारी ३:०० वाजताचे सुमारास अचानक स्फोट झाला व आग पसरली. त्यामध्ये ते दोघेही भाजले. तसेच त्याचे मालक यशवंत शेट्टी यांची सदरची गॅस एजन्सी अधिकृत आहे की अनधिकृत हे त्याला माहित नाही, असे सांगून तसा लेखी जबाब पोलीसांनी नोंदविला आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचेकडून वाचावे क्र. १ अन्वये अहवाल व कागदपत्र प्राप्त झाली असून, त्याअनुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि.०४/०६/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दि. ०४/०६/२०११ रोजीच्या सुनावणीस पोलिस उपनिरिक्षक श्री. एस.बी. रोकडे उपस्थित राहिले व त्यांनी वरिष्ठ पालिस निरिक्षक यांचे वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस दुर्गा गॅस एजन्सीचे मालक श्री. यशवंत शेट्टी उपस्थित राहिले व त्यांनी सुनावणीची पुढील तारीख मिळावी म्हणून वाचावे क्र. ४ अन्वये लेखी विनंती केली. तथापी, सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दिनांक २०/०६/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २०/०६/२०११ रोजीच्या सुनावणीस टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-२१४१चे मालक हिरालाल नागेश्वर उपाध्याय हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ५ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच दुर्गा गॅस एजन्सीचे मालक श्री. यशवंत शेट्टी यांनी सुनावणीची पुढील तारीख मिळावी म्हणून वाचावे क्र. ४ अन्वये लेखी विनंती केली. तथापी, सदरची सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करुन पुढील सुनावणी दि.२९/०६/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दि. २९/०६/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.१६/०७/२०११ रोजी ठेवण्यात आली.

टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-२१४१ चे मालक हिरालाल नागेश्वर उपाध्याय यांनी सुनावणी दरम्यान सादर केलेल्या त्यांचे लेखी निवेदनात, सदरचा जप्त केलेला टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-२१४१ हा डेक्कन मर्चन्ट को.ऑ.बँक लि., शाखा घाटकोपर, मुंबई यांच्या अर्थ सहाय्याने स्वराज एन्टरप्रायजेस या एजन्सीमार्फत खरेदी केला असून, सदर वाहनावर १,५०,०००/- रुपये कर्ज मंजूर करण्यात आले होते. सदर कर्जाचे वेळेवर हप्ते न भरता आल्यामुळे १२ ते १३ महीन्यानंतर म्हणजेच डिसेंबर २००७ मध्ये बँकेचे वसुली एजंट यांनी काही कागदपत्रे न देता त्याचे कडून वाहनाचा ताबा घेऊन गेले होते. त्यानंतर डिसेंबर २००७ ते आजपर्यंत सदर वाहनाचे बँकेने काय केले, याबाबत त्याला कडविलेले नाही व त्यांनी सुध्दा चौकशी केली नाही. वागळे इस्टेट पोलिस स्टेशनचे अधिकारी यांनी चौकशी करुन सदर घटनेची माहिती त्याला दिली. तेव्हा त्याला समजले की, सदरचे वाहन डेक्कन मर्चन्ट को.ऑ.बँक लि. येथील अधिकाऱ्यांनी श्री. यशवंत शेट्टी यांना काही रक्कम घेऊन बाकीची रक्कम कर्जस्वरुपात भरण्याचे कबूल करुन वाहन विकले आहे. यामध्ये बँकेचे कर्मचारी श्री. संजय इंगळे व त्याचे सहकारी याचा सहभाग होता. या सर्व व्यवहाराची माहिती त्याला श्री. यशवंत शेट्टी यांनी दिली असून सदरचे वाहन श्री. यशवंत शेट्टी स्वतः वापरत होते, असे सांगितले असल्याचे नमूद केले आहे. सबब, सदर निवेदनाच्या अनुषंगाने डेक्कन मर्चन्ट को.ऑ.बँक लि. चे प्रबंधक यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक असल्याने, त्यांना त्यांचे लेखी व मौखिक म्हणणे सादर करण्यासाठी दिनांक १६/०७/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १६/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. तथापी, सदर सुनावणीस डेक्कन मर्चन्ट को.ऑ.बँक लि., घाटकोपर शाखेचे प्रबंधक श्री. प्रकाश रामचंद्र राणे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळावी म्हणून वाचावे क्र. ६ अन्वये लेखी विनंती केली. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी एक संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक २७/०७/२०११ रोजी ठेवण्यात आली.

0005

दि. २७/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी अंतीम संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक ०९/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दि. ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीसही आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे एकतर्फी निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

दिनांक ०४/०६/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित पोलिस उपनिरिक्षक श्री. एस.बी. रोकडे उपस्थित यांनी सादर केलेल्या वरिष्ठ पालिस निरिक्षक यांचे लेखी अभिवेदनात, आरोपी यशवंत शेट्टी यांनी तेल कंपन्याची एजन्सी नसतांना तसेच इतर प्राधिकरणाची कोणतीही परवानगी नसतांना दुर्गा गॅस एजन्सी नावाने निरनिराळ्या हॉटेल कंपन्यांना गॅस सिलेंडर पुरवठा करण्याचा व्यवसाय करत असून मोठ्या प्रमाणात तेल कंपन्यांचे घरगुती तसेच व्यावसायीक वापरातील गॅस सिलेंडर त्याच्या कब्जात बाळगून घरगुती गॅस सिलेंडरमधून व्यावसायीक गॅस सिलेंडरमध्ये गॅस भरतांना घटनास्थळी स्फोट झाला. सदर गुन्ह्याच्या तपासात साक्षीदार मंजू कुल्ले गौडा यांनी दिलेल्या जबाबात, दुर्घटनाग्रस्त गाळ्यात यशवंत शेट्टी नावाचा इसम कोणताही परवाना नसताना गॅस सिलेंडरचा साठा करुन नोकरामार्फत सिलेंडरच्या टाक्यामधून थोडाथोडा गॅस काढून दुसऱ्या सिलेंडरमध्ये भरुन त्याचे वितरण केले आहे. गॅस काढत व भरत असताना सिलेंडरचा स्फोट झाला असल्याचे जबाब दिला आहे. तसेच सदर घटनेत जखमी झालेले रामकृष्ण हरी शिंदे व नितीन नारायण शेट्टी या दोन्ही इसमाचे औषधोपचार चालू असतांना कालातंराने निधन झाले आहे. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल आरोपी यांना परत दिल्यास ते पुन्हा त्यांचा गैरकायदेशिर धंदा सुरु करतील व त्यातून यापेक्षा जास्त मोठ्या स्वरुपाची दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी जप्त मुद्देमाल आरोपीतास परत न देता तो सरकारजमा व्हावा. अथवा त्याची योग्य रितीने विल्हेवाट लावणे संबंधी कार्यवाही व्हावी, असे नमूद केले आहे.

दिनांक २०/०६/२०११ रोजीच्या सुनावणी उपस्थित टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-२१४१ चे मालक हिरालाल नागेश्वर उपाध्याय यांनी सादर केलेल्या निवेदनात, सदरचा जप्त केलेला टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-२१४१ हा डेक्कन मर्चन्ट को.ऑ.बँक लि., शाखा घाटकोपर, मुंबई यांच्या अर्थ सहाय्याने स्वराज एन्टरप्रायजेस या एजन्सीमार्फत खरेदी केला असून, सदर वाहनावर १,५०,०००/- रुपये कर्ज मंजूर करण्यात आले होते. सदर कर्जाचे वेळेवर हप्ते न भरता आल्यामुळे १२ ते १३ महीन्यांनंतर म्हणजेच डिसेंबर २००७ मध्ये बँकेचे वसुली एजंट यांनी काही कागदपत्रे न देता त्याचे कडून वाहनाचा ताबा घेऊन गेले होते. त्यानंतर डिसेंबर २००७ ते आजपर्यंत सदर

वाहनाचे बँकेने काय केले, याबाबत त्याला कडविलेले नाही व त्यांनी सुध्दा चौकशी केली नाही. वागळे इस्टेट पोलिस स्टेशनचे अधिकारी यांनी चौकशी करुन सदर घटनेची माहिती त्याला दिली. तेव्हा त्याला समजले की, सदरचे वाहन डेक्कन मर्चन्ट को.ऑ.बँक लि. येथील अधिकाऱ्यांनी श्री. यशवंत शेट्टी यांना काही रक्कम घेऊन बाकीची रक्कम कर्जस्वरुपात भरण्याचे कबूल करुन वाहन विकले आहे. यामध्ये बँकेचे कर्मचारी श्री. संजय इंगळे व त्याचे सहकारी याचा सहभाग होता. या सर्व व्यवहाराची माहिती त्याला श्री. यशवंत शेट्टी यांनी दिली असून सदरचे वाहन श्री. यशवंत शेट्टी हे स्वत: वापरत असल्याचे सांगितले. त्यामुळे त्याचा या घटनेशी अथवा गुन्ह्याशी तसेच जप्त केलेल्या गाडीशी कोणत्याही प्रकारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या काहीही संबंध येत नसल्याचे नमूद केले आहे.

प्रस्तूत प्रकरणी जप्त मुद्देमालाचे मालक, इतर आरोपी / अपचारी यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. तसेच त्यांचे लेखी म्हणणे सादर केले नाही.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणी आरोपी/अपचारी यांचे निवेदन, अभिवेदन व अभिलेखावर उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी दिनांक ०१/०१/२०११ रोजी विलास गणपत देवघरे हे त्यांचे स्वत:चे टी.एम.सी. शॉपिंग सेंटर, तिनहात नाका इंटरनेटी मॉलचे बाजुला, ठाणे या ठिकाणी गाळा क्र. १२८ जवळ आले असता, त्यांना सदर ठिकाणी अग्नीशमन दल व पोलीस यांच्या गाड्या उभ्या असल्याचे दिसून आल्याने, त्यांनी चौकशी केली असता, त्यांचे गाळ्या शेजारी असलेल्या यशवंत शेट्टी यांचे गाळ्यामध्ये सुमारे १५:०० वाजता गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याने आग लागली असून त्यामध्ये नितीन शेट्टी व रामकृष्ण हे दोन इसम भाजून जखमी झाल्याचे त्यांना समजले. तदनंतर त्यांनी अग्नीशमन दल व ठाणे महानगर पालीकेचे अधिकारी यांचेकडे विचारणा केली असता, यशवंत शेट्टी याचेकडे सदर ठिकाणी घरगुती अथवा व्यवसायीक कारणासाठी वापरले जाणारे गॅस सिलेंडरचा साठा ठेवण्यासाठी अग्नीशमन दलाचा अथवा महानगर पालीकेचा कोणताही परवाना नसल्याचे त्यांना समजले. सदर ठिकाणी शेट्टी याची दुर्गा गॅस एजन्सी या नावाने गॅस एजन्सी असून, त्या गाळ्यामध्ये यशवंत शेट्टी हे हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमीटेड व भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमीटेडचे घरगुती तसेच व्यवसायाकरिता वापरले जाणारे गॅस सिलेंडरचा साठा करतात. तसेच सदर ठिकाणी इतर काही व्यापारी यांचे गाळे असून सदरचे सर्व गाळे हे ठाणे महानगर पालिकेच्या मालकीचे आहेत. ठाणे महानगर पालिकेकडून सदर गाळे विविध इसमांना भाड्याने दिलेले आहेत. तसेच कधी कधी गाळ्यामध्ये जागा नसल्यास नमूद यशवंत शेट्टी हे गॅस सिलेंडर टेम्पोमध्ये भरुन रस्त्यावर सुध्दा ठेवत असतात. सदर घटनेची तक्रार श्री विलास गणपत देवघरे यांनी पोलीस स्टेशनला दिल्यावरुन पोलीसांना

घटनास्थळी आढळून आलेले ४ टेम्पो व त्यामधील भारत पेट्रोलियम कंपनीचे ७० रिकामे, २६ भरलेले कमर्शियल सिलेंडर व हिन्दुस्थान पेट्रोलियम कंपनीचे २१ रिकामे कमर्शियल सिलेंडर तसेच भारत पेट्रोलियम कंपनीचे ९ रिकामे व ६ भरलेले घरगुती वापरातील गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले.

प्रस्तूत प्रकरणी जप्त मुद्देमालाचे मालक तसेच इतर आरोपी/अपचारी यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाही. तसेच त्यांचे लेखी म्हणणे सादर केले नाहीत. यावरुन आरोपी तसेच अपचारी आणि जप्त मुद्देमालाचे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते. तसेच सदर घटनेत जखमी झालेले रामकृष्ण हरी शिंदे व नितीन नारायण शेट्टी या दोन्ही इसमाचे औषधोपचार चालू असतांना कालातंराने निधन झाले असल्याचे पोलीसांचे अहवालात नमुद केले आहे.

पोलीसांनी सादर केलेल्या खुलाशात, आरोपी यशवंत शेट्टी याचेकडे कोणत्याही तेल कंपन्याची एजन्सी तसेच इतर प्राधिकरणाची कोणतीही परवानगी नसतांना दुर्गा गॅस एजन्सी या नावाने निरनिराळ्या हॉटेल कंपन्यांना गॅस सिलेंडर पुरवठा करण्याचा व्यवसाय करत असून मोठ्या प्रमाणात तेल कंपन्यांचे घरगुती तसेच व्यावसायीक वापरातील गॅस सिलेंडर त्याच्या कब्जात बाळगून घरगुती गॅस सिलेंडरमधून व्यावसायीक गॅस सिलेंडरमध्ये गॅस भरतांना घटनास्थळीं स्फोट झाला आहे. घटनास्थळी असलेल्या गाळ्याचे बाजूला मंजू कुल्ले गौडा यांचा गाळा असून, त्यांचेकडे सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने केलेल्या तपासात, दुर्घटनाग्रस्त गाळ्यात यशवंत शेट्टी नावाचा इसम कोणताही परवाना नसताना गॅस सिलेंडरचा साठा करुन नोकरामार्फत सिलेंडरच्या टाक्यामधून थोडाथोडा गॅस काढून दुसऱ्या सिलेंडरमध्ये भरुन त्याचे वितरण केले जायचे. गॅस काढत व भरत असताना सिलेंडरचा स्फोट झाला असल्याचा जबाब दिला आहे. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल आरोपी यांना परत दिल्यास ते पुन्हा त्यांचा गैरकायदेशीर धंदा सुरु करतील व त्यातून यापेक्षा जास्त मोठ्या स्वरुपाची दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी जप्त मुद्देमाल आरोपीतास परत न देता तो सरकारजमा व्हावा, असे नमूद केले आहे.

पोलीसांचा खुलासा तसेच पंचनाम्यावरुन यातील आरोपी यशवंत शेट्टी हा दुर्गा गॅस एजन्सी या नावाने गॅस सिलेंडरचा व्यवसाय करीत असून, घटनास्थळी हिन्दुस्थान पेट्रोलियम कंपनी व भारत पेट्रोलियम कंपनी या शासकीय तेल कंपन्याचे घरगुती तसेच व्यवसायीक वापरातील गॅस सिलेंडर आढळून आले आहे. तथापी, यशवंत शेट्टी यांनी दुर्गा गॅस एजन्सी या नावाने तेल कंपन्यांचे गॅस वितरण करण्याबाबत कोणतेही अधिकृत कागदपत्रे तसेच जप्त केलेल्या गॅस सिलेंडर बाबतचा कोणताही कायदेशीर पुरावा सादर केलेला नाही. त्याचप्रमाणे जप्त केलेले गॅस सिलेंडर परत मिळणेबाबत कोणताही दावा केलेला नाही. यावरुन जप्त केलेला गॅस सिलेंडरचा संपूर्ण साठा अवैध ठरत असून, आरोपी यशवंत शेट्टी याने संबंधितांशी संगणमत करुन त्याचेकडे गॅस एजन्सीचा कोणताही परवाना

नसतांना शासकीय तेल कंपन्यांचे घरगुती तसेच व्यवसायीक गॅस सिलेंडर गैरमार्गाने मिळवून त्याचा बेकायदेशीरित्या साठा केल्याचे व सदर गॅस सिलेंडर सारख्या ज्वलनशील पदार्थ स्वत:च्या कब्जात बाळगून मानवी जीवन धोक्यात येईल अशा प्रकारचे कृत्य करुन सदर ठिकाणी स्फोट होऊन दोन इसम निधन झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. प्रस्तूत प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून याबाबतची सत्यसत्यता मा. न्यायालयात तपासली जाईलच. सबब, जप्त करण्यात आलेले मे.हिन्दुस्थान पेट्रोलियम कंपनी व भारत पेट्रोलियम कंपनी या तेल कंपन्याचे घरगुती व व्यावसायीक वापरातील भरलेले व रिकामे गॅस सिलेंडरचा संपुर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-२१४१ हा हिरालाल नागेश्वर उपाध्याय यांचा मालकीचा असल्याचे त्यांनी व पोलिसांनी सादर केलेल्या निवेदनावरुन दिसून येते. तसेच हिरालाल नागेश्वर उपाध्याय यांनी केलेल्या खुलाशात, सदरचा टेम्पो हा त्यांनी ज्या डेक्कन मर्चन्ट को.ऑ.बँक लि., शाखा घाटकोपर, मुंबई यांच्या अर्थ सहाय्याने स्वराज एन्टरप्रायजेस या एजन्सीमार्फत खरेदी केला होता. त्याने कर्जाचे हफ्ते न भरल्याने डेक्कन मर्चन्ट को.ऑ.बँक लि. च्या वसुली एजंट यांनी डिसेंबर, २००७ मध्ये काही कागदपत्रे न देता त्याचे कडून वाहनाचा ताबा घेऊन गेले. त्यानंतर सदर वाहनाचे बँकेने काय केले, याबाबत त्याला कळविलेले नाही व त्याने सुध्दा चौकशी केली नाही. सदरचे वाहन डेक्कन मर्चन्ट को.ऑ.बँक लि. येथील अधिकाऱ्यांनी श्री. यशवंत शेट्टी यांना काही रक्कम घेऊन बाकीची रक्कम कर्जस्वरुपात भरण्याचे कबूल करुन वाहन विकले असल्याची माहिती त्याला श्री. यशवंत शेट्टी यांनी दिली असून सदरचे वाहन श्री. यशवंत शेट्टी हे स्वत: वापरत असल्याचे त्याला सांगितले. त्याचा या घटनेशी अथवा गुन्ह्याशी तसेच जप्त केलेल्या गाडीशी कोणत्याही प्रकारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या काहीही संबंध येत नसल्याचे नमूद केले आहे.

सदर टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-२१४१ चे मालक हिरालाल नागेश्वर उपाध्याय यांनी केलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने डेक्कन मर्चन्ट को.ऑ.बँक लि., शाखा घाटकोपरचे प्रबंधक यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची पूरेशी संधी देऊन देखील त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केलेले नाही. यावरुन सदर जप्त केलेल्या टेम्पोबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे दिसून येते. सद्य परिस्थितीत माझे समोर आलेल्या वस्तूस्थितीवरुन प्रस्तूत प्रकरणी जप्त केलेल्या गॅस सिलेंडरच्या वाहतुकीसाठी सदरचा टेम्पोचा गैरवापर केला असल्याचे दिसून येते. तसेच सदर टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-२१४१ शी कोणताही संबंध नसल्याचा खुलासा करुन सदर टेम्पो परत मिळण्याबाबत कोणताही दावा केलेला नाही. सबब, जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-२१४१ हा शासनजमा करुन जाहीर लिलावाने विक्री करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

RATIONING & DI... HEAD OFFIC... MUMBAI

प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेले टेम्पो क्र. एमएच-०३-एन-३७१०, टेम्पो क्र. एमएच-०३-एन-६८८५ व टेम्पो क्र. एमएच-०३-अेएन-२३२ चे मालक यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाही. तसेच त्यांचे लेखी म्हणणे सादर केले नाहीत. यावरुन सदर टेम्पोंचे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते. सबब, जप्त करण्यांत आलेले टेम्पो क्र. एमएच-०३-एन-३७१०, टेम्पो क्र. एमएच-०३-एन-६८८५ व टेम्पो क्र. एमएच-०३-अेएन-२३२ हे शासनजमा करुन जाहीर लिलावाने विक्री करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये वागळे इस्टेट पोलिस स्टेशन, ठाणे येथे गु.नो.क्र. I/०१/२०११ दि.०१/०१/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

## <u>आदेश :-</u>

१) जप्त करण्यात आलेले थ्री व्हीलर टेम्पो क्र. एमएच-०३-एन-३७१०, थ्री व्हीलर टेम्पो क्र. एमएच-०३-एन-६८८५, थ्री व्हीलर टेम्पो क्र. एमएच-०३-अेएन-२३२ व थ्री व्हीलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-२१४१ या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

२) तथापी, सदरचे चारही वाहनांचा लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

३) जप्त करण्यात आलेले भारत पेट्रोलियम कंपनीचे ७० रिकामे, २६ भरलेले कमर्शियल सिलेंडर व हिन्दुस्थान पेट्रोलियम कंपनीचे २१ रिकामे कमर्शियल सिलेंडर तसेच भारत पेट्रोलियम कंपनीचे ९ रिकामे व ६ भरलेले घरगुती वापरातील गॅस सिलेंडरचा साठा शासनजमा करण्यात यावा.

४) सदर शासन जमा करण्यात आलेले संपुर्ण गॅस सिलेंडर्सचा साठा राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, वाडीबंदर, मुंबई यांना देवून, त्यापोटी त्यांचेकडून प्राप्त होणारी रक्कम शासनजमा करावी.

५) जप्त करण्यात आलेले प्लास्टीक पाईपला नोजल असलेला लोखंडी रॉड, लोखंडी वजनकाटा (फूटलेला व दबलेला) व नोजल असलेले ५ लोखंडी रॉड इ. वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) यशवंत शेट्टी, दुर्गा गॅस एजन्सीचे मालक
२) नितीन नारायण शेट्टी, एजन्सीतील वसूली करणारा.
३) रामकृष्ण हरी शिंदे, डिलीव्हरी मॅन तसेच टेम्पो चालक
४) शरद, डिलीव्हरी मॅन
५) नाटी, डिलीव्हरी मॅन
६) थ्री व्हीलर टेम्पो क्र. एमएच-०३-एन-३७१० चे मालक
७) थ्री व्हीलर टेम्पो क्र. एमएच-०३-एन-६८८५ चे मालक
८) थ्री व्हीलर टेम्पो क्र. एमएच-०३-अेएन-२३२ चे मालक
९) थ्री व्हीलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायअे-२१४१चे मालक
१०) प्रबंधक, डेक्कन मर्चन्ट को.ऑ.बँक लि., शाखा घाटकोपर, मुंबई
(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वागळे इस्टेट पोलिस स्टेशन, ठाणे यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वागळे इस्टेट पोलिस स्टेशन, ठाणे यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल <u>विनाविलंब</u> या कार्यालयास सादर करावा.
२) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०-पी, डी-मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई-१० यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

E:\Ammaldata\Ammal Aadesh\Aadesh.doc